जुलै २०१९. तनिष्का

विचारसरणीच्या दिशेला वळत आहे.

कर्करोगाच्या उपचारात जगभर केमोथेरपीचा प्रभावी वापर केला जातो. या उपचार पद्धतीतून शरीरातील वेगाने वाढणाऱ्या पेशी मारल्या जातात. पण, आधुनिक वैद्यकशास्त्र आता या स्वरूपाच्या पेशींना मारणे या पेक्षा शरीरातील संरक्षण पेशींना ताकद देणे, त्यांच्यात कर्करोगाच्या पेशींविरुद्ध लढण्याची क्षमता निर्माण करणे, या दृष्टीने संशोधन करीत आहे. आयुर्वेदानेही नेमका हाच विचार हजारो वर्षांपूर्वी जगाला दिला आहे. शरीरातील विकृती मारण्यापेक्षा विकृती निर्माण होण्यामागचे नक्की कारण कोणते, याचा शोध महत्त्वाचा असतो. या विकृतीचा शोध घेतल्यानंतर ती दूर करून शारीरिक प्रक्रियांचे संतुलन साधण्यासाठी उपाययोजना करावी लागते. त्यातून प्रकृती उत्पन्न करणारी व्यवस्था सक्षम केली जाते. कर्करोगाच्या पेशी निर्माण होणाऱ्या शरीरातील कारणांवर उपचार केला जातो. याच मुद्याकडे आता आधुनिक संशोधकांचा विचार सुरू आहे.

जागतिक आरोग्यातील आव्हाने व त्यांची गरज पाहता सुमारे ७० टक्के आजार चुकीच्या जीवनशैलीमुळे होतात यावर नियंत्रण करेल किंवा झालेल्या आजारांना गंभीर स्वरूपात रूपांतरित न होऊ देण्यासाठी आयुर्वेदीय तत्त्वप्रणालीला महत्त्व प्राप्त होत आहे. हे केवळ स्थानिक पातळीवर महत्त्वाचे नसून देश व जागतिक पातळीवर हा मुद्दा वारंवार चर्चिला जात आहे.

### पर्यायी उपचाराकडे वाढता कल

कर्करोगावर उपचार घेणाऱ्यांमध्ये पर्यायी चिकित्सेचा वापर करणाऱ्या रुग्णांचा कल काय, हे जाणून घेण्यासाठी चार वर्षांपूर्वी युरोपीय महासंघाने सर्वेक्षण केले. त्यातून ५० टक्के पेक्षा जास्त रुग्ण हे रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यासाठी पर्यायी उपचार पद्धतीचा वापर करत असल्याचा निष्कर्ष निघाला.

युरोपीय महासंघाप्रमाणेच अमेरिकेतील कर्करोगात काम करणारी 'अमेरिकन सोसायटी ऑफ क्लिनिकल ऑनकॉलॉजी' यांनीही गेल्या वर्षी पर्यायी उपचार पद्धतीबाबत सर्वेक्षण केले. त्याचे निष्कर्षदेखील युरोपीय महासंघाशी मिळते-जुळते आहेत. कर्करोगावर उपचार करताना खर्च हा सर्वांत मोठा भाग असतो. गेल्या चार ते पाच वर्षांपासून कर्करोगाचे निदान झाल्यानंतर भारतीय रुग्णांमध्येदेखील आयुर्वेदाकडे चिकित्सा पर्याय म्हणून प्रथम पसंती देण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. आयुर्वेदाचा कर्करोगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. आयुर्वेद हा रुग्ण केंद्रित चिकित्सा करत असल्यामुळे रुग्णाच्या आयुष्याचा दर्जा उत्तम राहतो व जास्तीत जास्त आयुष्य कसे मिळेल व तेही चांगले याकडे प्राधान्याने लक्ष दिले जाते. एकंदरीत भारताप्रमाणे जागतिकस्तरावर आयुर्वेद व इतर पर्यायी चिकित्सा प्रणाली यांचा वापर वाढताना दिसत आहे.

### विकसनशील देशांच्या 'वेदना'

युरोपातील विकसित देश किंवा अमेरिकेसारख्या महासत्ता असलेल्या देशात राहणाऱ्या नागरिकांना आधुनिक उपचार उपलब्ध आहेत. पण, त्यातील बहुसंख्य रुग्ण आता पर्यायी उपचारांकडे वळत असल्याचे दिसून येते. हे चित्र एकीकडे दिसत असले तरीही, भारत आणि आपल्यासारख्या अनेक विकसनशील देशांमध्ये किंबहुना आफ्रिका खंडातील अविकसित देशांपुढे कर्करोगाचा ही वेगळीच समस्या आहे. कारण, या देशांमध्ये कर्करोगाचे निदान हेच मुळात उशिरा होते. ही या देशांची 'वेदना' आहे.

### काय केले पाहिजे?

कर्करोगाचे निदान आणि उपचार यंत्रणा सक्षम करणे, हा दीर्घकालीन उपाययोजनेचा एक भाग आहे. पण, जगभरात वाढत असलेल्या कर्करोगाला रोखणारी व्यवस्था नव्याने विकसित करणे, आताची गरज आहे. सुदृढ, निरोगी व्यक्ती कोणाला म्हणायचे, याची अचूक लक्षणे आयुर्वेदात दिलेली आहेत. आपण, त्या निकषांप्रमाणे निरोगी आहोत का, हे प्रत्येक व्यक्तीला सहज कळले पाहिजे. त्यासाठी निरोगी माणसांचे निकष जगातील प्रत्येक माणसापर्यंत पोचणे आवश्यक आहे. हा पहिला टप्पा झाला. दुसऱ्या टप्प्यावर, ज्या घटकांमुळे जीवनशैली बदलत आहे, आहारात बदल होत आहे, यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने हस्तक्षेप करण्याची वेळ आता आली आहे. त्यावर काही निर्बंध घालणे हे आता आवश्यक झाले आहे. त्यातून कर्करोग आणि इतर जीवनशैलीशी संबंधित आजारांना प्रतिबंध करता येईल. या बरोबरच कित्येक प्राथमिक आजारांची चिकित्सा व्यवस्थित केल्यास कर्करोग उद्‌भवण्याचा धोका बव्हंशी कमी करता येऊ शकतो व आयुर्वेदीय तत्त्वे ही याकरिता महत्त्वाचे कार्य करताना दिसतात.

(लेखक हे चिकित्सक, आंतरराष्ट्रीय संशोधक व दिल्ली येथील आयुष्य मंत्रालयाच्या सी. सी. आर. ए. एस. या संस्थेचे तज्ज्ञ सभासद आहेत.)

